# CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- CGRF/AZ/AUR/R/ 544 / 2015/ 07 Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Smt. Tejabai Dharamchand Jain
At post , Puri Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201 ( M.S. ) India
( Consumer No. 508690000320 / 508610000324 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of of Smt. Tejabai Dharamchand Jain At post , Puri Tq. Gangapur Dist. Aurangabad 431 201

You are requested to Redress the grievance or submit your Para wise reply at the time of hearing. The hearing in the matter will be held on 2**7.01 .2015** at 12.00 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-

Smt. Tejabai Dharamchand Jain
At post , Puri Tq. Gangapur
Dist. Aurangabad 431 201

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ / एझेड / औबाद / ग्रामिण / ५४४ / २०१५ / ०७**

**तक्रार दाखल दिनांक :- ०९.०१.२०१५.**
**निकाल दिनांक :- ०३.०३.२०१५.**

**श्रीमती. तेजाबाई धरमचंद्र जैन, तक्रारदार**
**मु.पो. पुरी, ता. गंगापुर,**
**जि. औरंगाबाद ४३१ २०१.**
**( ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व ५०८६१००००३२४ )**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), गैरअर्जदार**
**ग्रामिण विभाग,नोडल ऑफिस,**
**म.रा.वि.वि.कं.म. औरंगाबाद -**

मंच सदस्य

डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष
श्री. नामदेव आर गांधले, सदस्य / सचिव
श्री. विलासचंद्र सु. काबरा, सदस्य

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय –</u>**

अर्जदार श्रीमती तेजाबाई धरमचंद्र जैन मु.पो. पुरी, ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी दिनांक ३०.१२.२०१४ रोजी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुतलोकपाल ) विनिमय २००६ च्या अनुसुचि अ नमुन्यात कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांचे विरोधात तक्रार अर्ज मंचाकडे सादर केला आहे.

पान क्रमांक २/-

तकार अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) , ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांना दिनांक ०९.०१.२०१५ रोजी मुददेसूद अहवाल पाठविण्यासाठी पाठविण्यात आली होती. तकार अर्जाची संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

१ ) अर्जदाराने सादर केलेल्या म्हणण्यानुसार अर्जदार हया महावितरण कंपनीच्या ग्राहक असुन त्यांचे दोन कृषिपंपासाठी ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व ५०८६१००००३२४ असे आहेत . अर्जदाराचे म्हणण्यानुसार विदयुत कंपनी बेकायदेशीर रित्या विदयुत पुरवठा खंडीत करीत आहे. त्यामुळे अर्जदाराचे अनेक प्रकारे आर्थिक व शारिरिक नुकसान झाले आहे.दिनांक २०.११.२०१३ रोजी खंडीत वेळेची सविस्तर माहिती देऊन महाराष्ट्र विदयुत कंपनीकडून रुपये ४९,४५,५००/- ची मागणी केली होती तरी सदर भरपाई मंजूर करावी अशी विनंती केली आहे.

२ ) गैरअर्जदार , कार्यकारी अभियंता ( प्रशासन ), ग्रामिण मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक १०.०२.२०१५ रोजी सादर केलेल्या लेखी व तोंडी म्हणण्यानुसार ,अर्जदार / अर्जदाराचे प्रतिनिधी श्री. वर्धमान नेमीचंद्र जैन हे कधीही अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयास आले नाहीत. अर्जदाराने अंतर्गत ग्रा-हाणे निवारण कक्षात त्कार सादर केलेली नाही. ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व ५०८६१००००३२४ चे दिनांक ०८.११.२०१३ रोजी श्री.नेमीचंद्र डी.पी. पुरी हे ६३ के.व्ही. ए. चे रोहित्र फेल झाले होते. कनिष्ठ अभियंता, शेंदूरवादा यांनी वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार ८० टक्के विज ग्राहकांनी विज बिल भरल्याशिवाय फेल झालेले रोहित्र बदलून देता येत नाही. त्या राहित्रावरील ग्राहकांना विज बिल भरण्यास सांगितले होते. करारनाम्यातील अट क्रमांक ११ अ मध्ये विज वितरण कंपनीने स्पष्टपणे नमूद केले आहे की,संयत्रे व यंत्रातील बिघाड या कारणामुळे विदयुत पुरवठयास व्यत्ययास व उपभोगण्याच्या झालेल्या नुकसानीस पुरवठाकार जबाबदार व उत्तरदायी रोहित्र आणण्यासाठी वर्गणी गोळा करण्याचे कंपनीच्या कोणत्याही प्रतिनिधीने सांगितले नाही. रोहित्र मिळाल्यानंतर संबधित

पान क्रमांक ३/-

लाईनमन यांनी ते रोहित्र बसून दिले .एल.टी. लाईनच्या बिघाडाविषयी पूर्वी कसल्याही प्रकारची तक्रार दिली नव्हती.ग्राहक विज बिलाचा भरणा नियमित करीत नाहीत. वरीलप्रमाणे मुददा क्रमांक ३नुसार यंत्रसंचाचे बिघाडामुळे दोन्ही कृषि पंपाची कुठल्याही प्रकारे भरपाई देय नाही.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निष्कर्ष -**

वरीलप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सादर केलेले लेखी व तोंडी म्हणण्यानुसार मंच खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**आदेश**

१ ) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२ ) गैरअर्जदार यांनी ग्राहकाकडून नियमानुसार विज बिलाची वसुली करावी.

३ ) अर्जदाराचा अर्ज आर्थिक भरपाईविना निकाली काढण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना / ५४४ /२०१५ / ०७ /                                    दिनांक :-

प्रति,
श्रीमती तेजाबाई धरमचंद जैन,
मु.पो. पुरी, ता. गंगापुर,
जिल्हा औरंगाबाद
ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० व
५०८६१००००३२४

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/जालना / ५४४ / २०१५ / ०७ )

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. मंडळ कार्यालय, जालना
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॅाट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com